स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १८ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) खान्देशातील क्रांतीकारकांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान अंबापाणी येथील युध्द, चिमठाणा येथील आदिवासींचा लढा या व अशा काही उदाहरणावरुन दिसून येते असे प्रतिप्रादन प्राचार्य डॉ. बी.एन. पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त डॉ. पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. पाटील यांनी सांगितले की, प्रारंभीच्या काळात भिल्ल जमातीतील क्रांतीकारक गुमानसिंग नाईक, काझीसिंग नाईक यांनी सरंजामशाही विरूध्द लढत स्वातंत्र्याची मशाल पुढे नेली. अंबापाणीच्या लढयात खान्देशातील महिलांनी क्रांतीकारकांना भाकरी पुरूवून योगदान दिले. जल, जंगल आणि जमीन यावर कोणालाही ताबा मिळवू देणार नाही या भूमिकेतून क्रांतीकारक लढले. चहार्डी खजीना लूट, चिमठाणा खजीना लूट या संबंधीत त्यांनी विवेचन केले.

प्रा. एस.टी. इंगळे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा आपलया सगळयांसाठी अस्मितेचा भाग आहे. खान्देशातील क्रांतीकारकांचे योगदान नव्या पिढीने समजून घेतले पाहिजे. प्रशाळाच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन यांनी नव्या पिढीला मागचा इतिहास समजावा म्हणून असे क्रायर्कम घेत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप डॉ. ए.पी. पाटील यांनी केला. कार्यक्रमाच सूत्रसंचालन सुनील अहिरे यांनी केले.

## बातमी क्र. २

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या हिंदी विभागचे विद्यार्थी वैशाली भुरे व लखन वाघ यांना बँक ऑफ बडोदाच्या जळगाव क्षत्रिय कार्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यालयाच्या वतीने दरवर्षी हिंदी विभागातून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास रूपये ११ हजार आणि स्मृतीचिन्ह व रूपये ७ हजार ५०० व स्मृतीचिन्ह देवून सन्मानित केले जाते. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते मंगळवार दि. १८ ऑक्टोबर रोजी या दोन्ही विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले. यावेळी बडोदा येथील क्षेत्रीय राजभाषा अधिकारी सुकन्या देवी, डीजीटल बँकींगचे अधिकारी निखील वासनिक, गणित प्रशाळेचे संचालक प्रा. एस.आर. चौधरी, भाषा प्रशाळेच्या संचालक प्रा. मुक्ता महाजन हिंदी विभागप्रमुख प्रा. सुनील कुलकर्णी यांची उपस्थिती होती. प्रा. सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रिती सोनी व डॉ. पुरूषोत्तम पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## बातमी क्र. ३

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागातर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्याख्यान व निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात १५ ऑक्टोबर रोजी विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा. म.सु.पगारे यांनी व्याख्यानात सांगितले की, आजचा विचार करता इंटरनेट व मोबाईलच्या वापरामुळे वाचन संस्कृती लयाला जाऊ पाहत आहे. माणसाने ज्ञान अर्जित करण्यासाठी वाचत राहिले पाहिजे. अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख डॉ.मनिषा इंदाणी होत्या. याच कार्यक्रमात शिक्षक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेते प्रथम क्रमांक नयना गवळे, समाजशास्त्र प्रशाळा, व्दितीय क्रमांक पठाण सामिया खानम जुबेर अहमद, व तृतीय क्रमांक धनश्री महाजन दोघेही संख्याशास्त्र प्रशाळा, उत्तेजनार्थ प्राजक्ता राजपूत भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र व ट्विंकल वनकर, पर्यावरणशास्त्र व भूविज्ञान प्रशाळा यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.रणजित पारधे यांनी करुन दिला. विद्यार्थी स्वप्नील पाटील, रुपाली पाटील, कांचन मिश्रा आणि मोनिका सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सविता अहीरराव तर आभार स्नेहा पवार यांनी मानले.

## बातमी क्र. ४

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या अन्न तंत्रज्ञान विभागात जागतिक अन्न दिवस साजरा करण्यात आला.

अन्नासंबंधी जागरूकता, अन्नाचे जतन व संशोधन आणि संवर्धन या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. संचालक प्रा. जे.बी. नाईक, विभागप्रमुख डॉ. व्ही.आर. पराते, प्रा. जी.ए. उस्मानी, प्रा.शिरसाम, डॉ. बाथे, डॉ. तालीब,प्रा. मांडे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी